# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मौजा मौदा येथे राष्ट्रीय महामार्ग क्र.०६ वर असलेल्या वाय पॉईटवर १६ जणांचा अपघातात मृत्यु झाल्याबाबत**

**(१) ८७३२ (१०-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मौदा येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ०६ वर असलेल्या वाय पाईंटवर गत दोन वर्षात १६ जणांचा अपघाताने मृत्यू झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर औद्योगिकीकरण व शेती उत्पादन होत असून तेथे एनटीपीसी, रिलायन्स, बिर्ला व अन्य उद्योगसमुहांचे कारखाने तसेच अनेक धार्मिक व आध्यात्मिक स्थळे असल्यामुळे यात्रेच्या वेळी लाखांच्यावर भाविक दर्शनाला येत असल्यामुळे नेहमीच लोकांची व वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरु असल्यामुळे अपघाताच्या घटनेत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गावर उक्त ठिकाणी नविन उड्डाण पुल बनविण्याची तेथील ग्रामस्थांनी गत दोन वर्षापासून मागणी केली असून सुध्दा अद्यापपर्यंत पुलाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार या प्रलंबित पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू पुलाचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१७) :** (१) नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ (नविन क्र. ५३) वर असलेल्या मौदा येथील वाय पॉईंटवर मागील दोन वर्षात १६ जणांचा अपघाताने मृत्यू झालेला आहे हे खरे नाही. सन २०१३ पासून ते ऑक्टोबर २०१५ पर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर असलेल्या मौदा येथील वाय पॉईंटवर ३ जणांचा अपघाताने मृत्यू झालेला आहे, असे अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) यांच्या अहवालात नमुद आहे.

(२) सदर महामार्गावर औद्योगिकरण व शेती उत्पादन होत असून तेथे एनटीपीसी, रिलायन्स, बिर्ला व अन्य उद्योगसमुहांचे कारखाने आहेत. महामार्गावरील मौदा वाय पॉईंट पासून ४०० ते ५०० मिटर अंतरावर बाब जुमदेव यांचे स्मारक असून दरवर्षी २६ जानेवारीला यात्रा भरत असते सदर यात्रेला ७ ते ८ लाख भाविक दर्शनाला येतात तसेच दररोज १००० ते १२०० लोक दर्शनाला येतात. मागील एक ते दिड वर्षापासून सदर महामार्ग चौपदरी झाल्यामुळे अपघाताच्या घटनेत वाढ होत आहे असे म्हणता येणार नाही, असे अपर पोलीस महासंचालक (वा.) यांच्या अहवालात नमुद आहे.

(३), (४) व (५) सदर ठिकाणी उड्डाणपुल बांधण्याचा अंतर्भाव सवलतकाराच्या कामाच्या वाव मध्ये नव्हता परंतु त्या ठिकाणी उड्डाणपुल बांधण्याचा कामाच्या बदलाच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मुख्यालय नवी दिल्ली यांनी तत्वतः मान्यता दिली आहे तसेच ही बाब केंद्र शासनाच्या रस्ते, वाहतुक व परिवहन यांच्या सन २०१५-१६ च्या वार्षिक आराखड्यामध्ये अंतर्भुत केलेली असून या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक करण्याचे काम सुरु असून प्रत्यक्षात काम सुरु झाल्यानंतर काम पुर्ण होण्यास अंदाजित १ वर्षाचा कालावधी अपेक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

---

### खामगाव-जालना या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत

**(२) २७२०० (३१-०७-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव-जालना या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करुन या महामार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता सिमेंट कॉक्रिटचा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे तसेच त्याकरीता किती निधीची तरतूद केंद्राकडून करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१७) :** (१) खामगाव-जालना या लांबीतील जालना-चिखली-बुलढाणा ही लांबी ह्या भाग राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३A म्हणून घोषित झाली आहे तसेच बुलढाणा ते खामगांव ही लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याबाबत केंद्रसरकारने तत्वतः मान्यता दिली आहे.

(२) सद्यस्थितीत असा प्रस्ताव विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील शासकीय जागा विविध संस्था व क्लबना ३० ते ९९ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर दिल्याबाबत**

**(३) ३६६१३ (०८-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील शासकीय जागा विविध संस्था व क्लबना ३० ते ९९ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यात आल्या होत्या असून सदर जागेंची मुदत संपल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुदत संपल्यानंतर सदर जागा शासनास परत करण्यास संस्था व क्लब विरोध करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागा ताब्यात घेण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०८-२०१७) :** (१), (२), (३) व (४) मुंबई शहरात विविध संस्था, क्लब यांना भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींपैकी काही संस्था, क्लब यांना भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टयाची मुदत संपली आहे. निवासी व वाणिज्यिक प्रयोजनार्थ दिलेल्या भाडेपट्टयाची मुदत संपलेल्या जागांचा भाडेपट्टा नुतनीकरण करण्याबाबत शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/प्र.क.४०५/ज-२, दिनांक १२.१२.२०१२ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते. तसेच जिमखान्यांना भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत शासन निर्णय क्र. जमीन-२५१२/०८/प्र.क्र.५१/ज-२, दिनांक २३.६.२०१७ अन्वये धोरण ठरविण्यात आलेले आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गोदामांची खरेदी विक्री करण्यास बंदी घातल्याबाबत**

**(४) ४१२०५ (२०-०४-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वालशिंद (ता.भिवंडी, जि.ठाणे) या गावामध्ये शाकीय भूखंडाचे खोटे कागदपत्र तयार करून परस्पर गोदाम विकल्याने जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर गोदामांच्या बांधकामा विरोधात दिनांक ०८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गोदामे विकणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०८-२०१७) :** (१) मौजे वालशिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. १७/१ व १९/१ या सरकारी जमिनीवर मे.अरहम अनमोल प्रोजेक्टस प्रा. लि. यांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्या मार्गदर्शनाखाली काही अनधिकृत बांधकामे दि.०८/०१/२०१६ रोजी निष्कासित करण्यात आली आहेत.
(२), (३) व (४) प्रस्तुत जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची विनंती अर्जदार मे.अरहम अनमोल प्रोजेक्टस प्रा. लि. यांनी दि.१९/१२/२०१५ च्या अर्जान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली होती. अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ६४९/२०१६ मध्ये सदर अर्जावर दि.३०/०४/२०१६ पर्यंत निर्णय घेण्याचे, तसेच अर्जावरील निर्णयापर्यंत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५० अन्वये दिलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने निष्कासनाबाबत कारवाई न करण्याचे आदेश दि.१६/०२/२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुषंगाने मौजे वालशिंद, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. १७/१ व १९/१ ही जमीन आकारी पडीत असल्याने कब्जेहक्काने मिळण्याची अर्जदार यांची विनंती जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अमान्य केली आहे.

---

## कुंभार समाजावर गौण उत्खनन व मातीच्या वापरावर बंदी घातल्याबाबत

**(५) ४१४०४ (२०-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेली अनेक वर्षे परंपरागत वीट व्यवसाय करणाऱ्या कुंभार समाजावर गौण उत्खनन व मातीच्या वापरावर बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुंभार समाजातील एका कुटुंबाला ५०० ब्रास माती उत्खननास व वाहतूक केल्यास शासनाला कोणत्याही प्रकारची रॉयल्टी भरायची नाही असा अध्यादेश शासनाने दिनांक २१ जुलै, २०१४ रोजी राजपत्राद्वारे काढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अध्यादेश काढूनही महसूल विभाग कुंभार समाजावर दंडात्मक कारवाई करत असल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अध्यादेशाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) शासन अधिसूचना दि.२१/०७/२०१४ अन्वये तहसीलदार किंवा नायब तहसिलदार यांच्या लेखी पुर्व परवानगीने काणेतीही फी किंवा स्वामीत्वधन न देता कोणत्याही पिढीजात कुंभाराच्या कुटुंबास विटा, कौले किंवा इतर वस्तु तयार करण्याच्या व्यवसायासाठी वर्षाला ५०० ब्रासपर्यंतच्या मर्यादेत माती काढता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) सदर अधिसूचनेची राज्यात अंमलबजावणी सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एलफिस्टन स्टेशन (मुंबई) येथील सेनापती बापट मार्ग येथे इंडिया बुल्सचे बांधकाम सुरु असल्याबाबत**

**(६) ४२९३७ (१७-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.दिपक केसरकर (सावंतवाडी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एलफिन्स्टन स्टेशन (मुंबई) येथील सेनापती बापट मार्ग येथे इंडिया बुल्सचे बांधकाम सुरु असुन त्यांनी समोर रहिवाशी इमारती असूनही पुलाखालच्या जागेचा ताबा घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलाखालची जागा ही राज्य विकास महामंडळाला भाड्याने दिलेली असताना त्या जागेचा करार करण्याचा उक्त महामंडळाला अधिकार नसुन पालिकेची ही जागा या महामंडळाने इंडिया बुल्स या कंपनीला अवैधरित्या कराराने दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०८-२०१७) :** (१) ते (४) हे खरे नाही. एलफिस्टन पुलाखालची जागा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ताब्यात आहे. महामंडळाने सदर जागा मे.स्टोअर वन रिटेल इंडिया लिमिटेड या कंपनीस सुशोभीकरणासाठी EOI तत्वावर दि. ७.१.२०१५ पासून ११ वर्षाच्या करारावर दिली आहे.

---

**मुरबाड तालुक्यातील आदिवासींनी आपल्या विविध मागण्यांबाबत तहसील कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत**

**(७) ४४१७४ (२९-०४-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड तालुक्यातील आदिवासींनी आपल्या विविध मागण्यांसाठी माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात तहसील कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन या भागातील आदिवासींच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) श्रमजीवी संघटना-महाराष्ट्र यांनी दि.०४/०१/२०१६ रोजी तहसिलदार, मुरबाड यांना दिलेल्या निवेदनात एकूण १० मागण्या असून सदर मागण्यांचा विषय ग्राम विकास विभाग तसेच इतर अन्य विभागांशी संबंधित असल्याने निवेदनातील मागण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुरबाड व इतर संबंधित विभागांना तहसिलदार, मुरबाड यांनी कळविले आहे.

---

**औरंगाबाद, जालना व लातूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध कामांच्या मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याबाबत**

**(८) ४९५८८ (२९-०४-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद, जालना व लातूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध कामांच्या मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याप्रकरणी शोध घेऊन चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार मोजमाप पुस्तिका गहाळ होण्याच्या प्रकारास जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) मोजमाप पुस्तिका गणतीची प्रक्रिया प्रगतीत आहे. मोजमाप पुस्तिकांच्या पडताळणीमध्ये असलेली तफावत कमी होत असल्याने सद्य:स्थितीत मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्या आहेत असे म्हणता येणार नाही.
(३) मोजमाप पुस्तिकांच्या अंतिम गणतीनंतर मोजमाप पुस्तिका प्राप्त न झाल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मजूर सहकारी संस्थांना ३ लाखापर्यंतच्या कामामध्ये विनानिविदा सवलत मिळण्याबाबत**

**(९) ५१९६२ (०३-०५-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी शासन निर्णयाव्दारे रु. ३ लाखाच्या वरील कामांची ई-निविदा पध्दत सुरु केल्याने अनेक मजूर सहकारी संस्थांना कामे मिळणे बंद झाल्याने या संस्थांमधील मजूर बेरोजगार झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ मर्या. गुलटेकडी, मार्केटयार्ड पुणे तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.वित्त मंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे मजूर सहकारी संस्थांना रु.१५ लाखापर्यंतची कामे विना-निविदा सवलत मिळावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) या विभागास प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील खेड-शिवापूर येथील प्रवाशांना मुलभूत सेवा पुरविल्या जात नसल्याबाबत**

**(१०) ५२००० (२८-०४-२०१६). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खेड-शिवापूर येथील टोल नाक्यावर भोर व हवेली प्रांत अधिकारी यांनी केलेल्या पाहणी दरम्यान प्रवाशांना मुलभूत सेवा पुरविल्या जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे भेट नोंदवही व सीसीटीव्ही फुटेज ठेवले जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पुणे जिल्ह्यातील खेड-शिवापूर येथील टोल नाक्यावर भोर व हवेली प्रांत अधिकारी यांनी केलेल्या पाहणी दरम्यान प्रवाशांना मुलभूत सेवा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१७) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचे अधिनस्त असलेल्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत पुणे सातारा राष्ट्रीय महामार्ग असून त्या लांबीत खेड-शिवापूर येथील पथकर नाका आहे.

त्या पथकर नाक्यावर सवलत कारारनाम्यानुसार प्रवाशांना मुलभूत सेवा जसे पिण्याचे पाणी वैदयकीय प्रथमोपचार व रुग्णवाहीका या सुविधा उपलब्ध आहेत.

या व्यतिरिक्त पथकर नाक्यावर भेट नोंदवही व सीसीटीव्ही फुटेज ठेवण्यात येत असून तपासणीच्या १५ दिवसांपूर्वीपर्यंतचे स्वयंचलीत सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध होऊ शकत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### माझगाव (मुंबई) येथील कनिष्ठ न्यायालयाची इमारत १७ वर्षात धोकादायक ठरल्याबाबत

**(११) ५३१९१ (२०-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) येथील कनिष्ठ न्यायालयाची इमारत केवळ १७ वर्षात धोकादायक ठरल्याने रिक्त करावी लागली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१७) :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वाधिकारे चौकशी करुन शासनास सादर केलेला शिफारस अहवाल दिनांक १६/११/२०१६ रोजी शासनास प्राप्त झाला असून त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### डोणगांव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) शिवारात असलेल्या काच नदीपात्रात शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(१२) ५५०८३ (२९-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील डोणगांव शिवारात असलेली काच नदी कोरडी पडली असून या नदीचे पात्र अनेक ठिकाणी बुजविण्यात येत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या नदीपात्राच्या जागेत काही शेतक-यांनी अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे नदीपात्रातील अतिक्रमण हटवून त्यात जलसाठा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०९-२०१७) :** (१), (२), (३) व (४) मेहकर तालुक्यातील डोणगांव शिवारात असलेली काच नदी कोरडी पडली आहे. सदर नदीचे पात्र कोणत्याही शेतक-याने अथवा व्यक्तीने बुजविले नसून नदीपात्रामध्ये शेतकऱ्यांनी अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले नाही.

---

### नांदेड जिल्ह्यात मजूर सोसायट्याच्या नावाखाली कंत्राटदार व राजकीय नेत्यांनी केलेला गैरव्यवहार

**(१३) ५९०३८ (२४-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात मजूर सोसायट्या काढण्यासाठी राजकीय नेते व श्रीमंतानी स्वत:च्या कागदोपत्री “श्रमिक” दाखवून शासनाची दिशाभुल केल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मजूर सोसायट्यांच्या नावावर काम घेणाऱ्या कंत्राटदार व राजकीय मंडळींनी चक्क मजूर संस्थेच्या अध्यक्षांच्या बोगस सह्या व शिक्के मारुन नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागाला बिले मिळण्यासाठी पत्रव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या दोषी व्यक्तींवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा मलकापूर (ता.उदगीर, जि.लातुर) येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(१४) ५९७८३ (२४-०८-२०१६). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मलकापूर (ता.उदगीर, जि.लातुर) येथील बाहेरुन गेलेला वळण रस्ता हा शहरालगत असून या रस्त्यावर अवजड वाहनांची मोठी वर्दळ असल्यामुळे रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वळण रस्त्यावर मलकापूर गावाजवळ उड्डाणपूलाला मंजूरी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) मौ.मलकापूर, ता.उदगीर,जि.लातूर येथून बाहेरुन गेलेल्या वळण रस्त्यावर रेल्वे क्रॉसिंग असून, त्या ठिकाणी रेल्वे फाटक नसल्याने अद्याप वाहतूक सुरु करण्यात आलेली नाही. त्यामुळे या वळण रस्त्यावर अपघात होत नाहीत.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

### शासकीय भूखंडाच्या मागणीसंदर्भातील अनेक प्रकरणांवर शासनाने निर्णय घेतला नसल्याबाबत

**(१५) ६०७४६ (१९-०८-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श भूखंड घोटाळा प्रकरणानंतर मा.न्यायालयाच्या निदेशानुसार राज्य शासनाने शासकीय भूखंड वाटपाच्या जुन्या धोरणानुसार कोणालाही शासकीय जमिनीचे वाटप केले नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय भूखंडाच्या मागणी संदर्भातील गेल्या ५ ते ६ वर्षामध्ये शासनाकडे आलेल्या अनेक प्रकरणांवर शासनाने निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने जमिनीच्या वाटपाच्या प्रकरणी निर्णय घेणार आहे काय व असल्यास, किती कालावधीत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१७) :** (१), (२), (३), (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ तसेच अनुषंगिक शासन निर्णयातील तरतुदींनुसार शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांवर प्रकरण परत्वे गुणवत्तेवर कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई-पुणे (यशवंतराव चव्हाण) एक्सप्रेस मार्गाची क्षमता वाढविण्याबाबत**

**(१६) ६५४५४ (१६-१२-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-पुणे (यशवंतराव चव्हाण) एक्सप्रेस मार्गाची क्षमता वाढवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एक्सप्रेस मार्गावरील खोपोली एग्झिट ते कुसगाव (सिंहगड संस्था) या भागात दोन बोगदे व आठ पदरी रस्ते व त्यानुषंगाने येणाऱ्या इतर कामांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने स्वतःचा निधी उभारुन आंतरराष्ट्रीय स्थळांवर निविदा मागवून हे काम पूर्ण करण्याची अट यामध्ये समाविष्ट आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम किती कालावधीत पुर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०८-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) होय, सदर प्रकल्पाची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने स्वत: निधी उभारुन EPC तत्वावर आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक निविदा मागवून अंमलबजावणी करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(४) सदर प्रकल्प २०२०-२१ पर्यंत पुर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे व त्या अनुषंगाने सदर कामाकरीता आंतरराष्ट्रीय स्तरावर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांनी मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाला विरोध केल्याबाबत**

**(१७) ६६१२८ (२४-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड),**

**श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या प्रस्तावित मुंबई- नागपूर समृध्दी महामार्गासाठी नाशिक जिल्हयातील इगतपूरी व सिन्नर तसेच ठाणे जिल्हयातील शहापूर व भिवंडी येथील १ हजार १७४ हेक्टर जमीन संपादीत केली जाणार असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १२० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी किती हेक्टर जमिनीची आवश्यकता असून या महामार्गाची लांबी किती किलोमिटर आहे, हा महामार्ग कोणकोणत्या जिल्हयातून / तालुक्यातून जाणार आहे तसेच महामार्गासाठी लागणाऱ्या जमिनीपेक्षा दर ४० कि.मी.अंतरावर उभ्या राहणाऱ्या जनसुविधा केंद्राना प्रत्येकी ५०० हेक्टरवर जमीन लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्रशासकीय स्तरावरुन कोणतीच अधिकृत माहिती दिली जात नसल्याने प्रशासन विरुध्द ग्रामस्थ असा संघर्ष उभा राहिला असून या महामार्गाचे काम सुरु होत पर्यंत नागपूर-वर्धा-यवतमाळ या रस्त्याची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचा विरोध मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री ठाणे जिल्हा तसेच प्रत्येक जिल्हयातील प्रशासनाकडे लेखी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दर्शविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकल्पासाठी ज्यांच्या जमिनी घ्यायच्या त्या ग्रामस्थांना विश्वासात घेण्याबाबत, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला व अर्थसहाय्य शासनामार्फत देण्याबाबत तसेच नागपूर-वर्धा-यवतमाळ या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०८-२०१७) :** (१) नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) या करीता नाशिक जिल्हयातील इगतपूरी व सिन्नर येथील सुमारे १२९०.६६ हेक्टर आर. तसेच ठाणे जिल्हयातील शहापूर व भिवंडी येथील ७७४.२६.४० हेक्टर आर. इतकी जमीन संपादीत केली जाणार आहे.

(२) नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गाची एकूण लांबी साधारणत: ७०६ कि.मी. व रुंदी १२० मी. आहे. त्याप्रमाणे या महामार्गाकरीता साधारणत: ८४७२ हे.आर. जमिनीची आवश्यकता आहे. सदर द्रुतगती मार्ग हिंगणा (जि.नागपूर), सेलू, वर्धा, आर्वी (जि.वर्धा), धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, नांदगाव खांडेश्वर (जि.अमरावती), कारंजा, मंगळूरपीर, मालेगाव, रिसोड (जि.वाशिम), मेहकर, लोणार, देऊळगाव राजा, सिंदखेडराजा (जि.बुलढाणा), जालना, बदनापूर (जि.जालना), औरंगाबाद, गंगापूर, वैजापूर (जि.औरंगाबाद), कोपरगाव (जि.अहमदनगर), इगतपुरी, सिन्नर (जि.नाशिक) व शहापूर, भिवंडी, कल्याण (जि.ठाणे) या तालुक्यातून जात आहे. या द्रुतगती मार्गावर साधारणत: २५ ते ४० कि.मी. अंतरावर उभारण्यात येणाऱ्या नवनगराकरीता (कृषी समृद्धी केंद्रे) साधारणत: प्रत्येकी ५०० हे.आर. जमीन लागणार आहे.

(३) प्रशासकीय स्तरावरुन कोणतीच अधिकृत माहिती दिली जात नाही, ही बाब खरी नाही. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामध्ये जमिनीच्या संयुक्त मोजणीवेळी शेतकऱ्यांचा काही प्रमाणात विरोध झाला आहे. नागपूर-वर्धा-यवतमाळ या रस्त्याचा नागपूर ते बुटीबोरी हा भाग राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व बुटीबोरी-वर्धा-यवतमाळ हा भाग राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर यांच्याकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे.

नागपूर-वर्धा-यवतमाळ या रस्त्याची दुरावस्था झालेली नाही.

(४) यासंदर्भात सप्टेंबर, २०१६ व नोव्हेंबर, २०१६ मध्ये निवेदने प्राप्त झाली आहेत.

(५) शासनाच्या धोरणाप्रमाणे जमीन धारकांना विश्वासात घेवूनच त्यांना देय असलेले लाभ दिले जाणार आहेत व त्याची माहिती ग्रामस्थांना देण्यात येत आहे.

नागपूर-वर्धा-यवतमाळ या मार्गावरील नागपूर ते बुटीबोरी ही ३०.०० कि.मी. लांबी सुस्थितीत असून बुटीबोरी-वर्धा-यवतमाळ या एकूण ११५ कि.मी. लांबीतील खराब झालेल्या ७१.०० कि.मी. लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम पूर्णत्वास येत असून रस्ता सुस्थितीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिंवडी (जि.ठाणे) येथील पोलीस वसाहतींची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१८) ६७१२४ (१६-१२-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) येथील भादगवड प्रांत कार्यालय, जुना पोस्ट ऑफिस पोलीस नियंत्रण कक्ष इत्यादी ठिकाणी असलेल्या पोलीस वसाहतींची दुरवस्था झाली असून यातील काही इमारती महानगरपालिकेने अति धोकादायक जाहिर केलेल्या असून या चारही वसाहतीमध्ये राहणाऱ्या पोलीसांच्या वेतनातून देण्यात येणारा घरभाडे भत्ता कापण्यात येत असतानाही निवासस्थानांच्या सोयी सुविधाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने वसाहतींची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने इमारतींच्या दुरुस्तीचे काम करुन इमारातीकडे दुर्लक्ष करण्याऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१७) :** (१) भिवंडी (जि.ठाणे) येथील भादवड प्रांत कार्यालय, जुना पोस्ट ऑफिस व पोलीस नियंत्रण कक्ष येथील पोलीस निवासस्थानांच्या इमारती हया अतिशय जुन्या असल्याने इमारतींची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे. उपरोक्त पैकी भादवड येथील पोलीस निवासस्थानाच्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता गृह विभागाने एकूण

रु.८,४५,८५,१०३/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच भिवंडी येथील पोलीस इमारतींच्या पुनर्बांधणीबाबत पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेमार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ (जि. कोल्हापुर) तालुक्यातील नदी पात्रातील वाळू साठे निर्गमित करण्याबाबत**

**(१९) ६८६४१ (१६-१२-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील नदी पात्रातील वाळू साठे निर्गमित करण्याची मुदत दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजी पर्यंत असतांना अद्याप वाळू साठे नदीपात्रात असल्याने बेकायदा वाळू उपसा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू साठे कृष्णा नदीपात्रात ठेवणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१), (२) व (३) शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) सन २०१५-१६ या वर्षाच्या लिलाव धारकांनी मंजूर वाळूगटातून वाळू उत्खनन करून नदीपात्रालगत ठेवण्यात आलेली वाळू उचल/वाहतूक करण्याची मुदत दि.१०/१०/२०१६ रोजी संपल्यानंतर, शिरोळ तालुक्यातील नदीपात्रालगत कोठेही वाळूसाठे निदर्शनास आले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील गायरान जमिनीतून अवैधरित्या गौण खनिजांची चोरी झाल्याबाबत**

**(२०) ६८८३९ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील जुनी, हसनाळी व येवती येथील गायरान जमिनीतून गेल्या २३ वर्षापासून नुसरत कन्स्ट्रक्शन या कपंनीने खोटी बनावट कागदपत्रे बनवून अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैध गौण खनिजांची चोरी प्रकरणी चौकशी उप आयुक्त (पुनर्वसन) औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप आयुक्त (पुनर्वसन) औरंगाबाद यांच्यामार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झालेली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या कन्स्ट्रक्शन कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन विषयी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी उप आयुक्त (पुनर्वसन) औरंगाबाद यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार उप आयुक्त (पुनर्वसन) औरंगाबाद यांनी दि.१८/०६/२०१६, दि.२७/०७/२०१६ व दि.२६/१०/२०१६ रोजी सुनावणी आयोजीत केली होती. दि.२६/१०/२०१६ रोजीच्या सुनावणीमध्ये मोजणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांच्यास्तरावर मोजणीची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील सूसन रुग्णालयात सॅण्डविच बस बार ही यंत्रणा लावण्याच्या निविदेत झालेला गैरव्यवहार

**(२१) ६९१५८ (१६-१२-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील सूसन रुग्णालयात सॅण्डविच बस बारही यंत्रणा लावण्याकरिता दिनांक ५ जुलै, २०१५ रोजी काढण्यात आलेल्या ई निविदांतील अटींची पूर्तता न करणाऱ्या पारेख ब्रदर्स या कंपनीला दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी वर्क ऑर्डर देऊनही अद्यापी या कंपनीने कामाला सुरुवात केली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सॅण्डविच बस बारचे काम किती रक्कमेचे होते, ई-निविदेतील अटी कोणकोणत्या, दिनांक ५ जुलै, २०१५ नंतर व वेळेत ई-निविदा सादर करणाऱ्या कंपन्या कोणत्या, पारेख ब्रदर्स यांनी निविदेतील अटींची पूर्तता न करतानाही त्यांना वर्क ऑर्डर देण्यात येऊनही त्यांनी अद्यापी कामाला सुरुवात न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पारेख ब्रदर्स कंपनीने निविदेतील अटींमध्ये विचारलेल्या विविध अनुभव व प्रमाणपत्रांपकरिता सादर केलली कागदपत्रे बनावट असतांनाही, या कंपनीला काम देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पारेख ब्रदर्स या कंपनीचा बचाव करणाऱ्या व सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व पारेख कंपनीने शर्ती व अटींची पूर्तता न केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०९-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) दि.२५/१०/२०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामे सुरु करण्यात आलेली आहेत.
(३) कंत्राटदाराने निविदेतील अटींची पूर्तता केली असून कंपनीची योग्यता तपासून काम देण्यात आले आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १४ हजार मजूर सहकारी संस्थांना १५ लाखापर्यंतची कामे ई-निविदा शिवाय मिळणेबाबत**

**(२२) ७०४४४ (१६-१२-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १४ हजार मजूर सहकारी संस्थांतील सात लाख कामगारांची उपासमार होत असल्याने १५ लाखापर्यंतची कामे "ई-निविदा" शिवाय देण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, सचिव, सार्वजनिक बांधकाम, सचिव, उद्योग विभाग यांचेकडे सभापती सोलापूर डिस्ट्रिक्ट लेबर सोसायटीज् को.ऑप. फेडरेशन लि. सोलापूर यांनी दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी व तत्पूर्वी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील लोकप्रतिनिधी व इतर जिल्हा लेबर सोसायटीनीही याबाबत शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यात सक्शन पंपाने बेकायदा रेती उपसा होत असल्याबाबत**

**(२३) ७०४६८ (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात सक्शन पंपाने बेकायदा रेती उपसा करण्यासाठी पोलीस व महसूल विभागाला रेती व्यावसायीक लाच देत असल्याप्रकरणी श्रमजीवी संघटनेने भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठविल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेती व्यावसायीक, लाच घेणाऱ्या पोलीस व महसूल अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१) श्रमजीवी संघटनेने दि.१७/१०/२०१६ रोजी तहसिलदार वसई यांना अशा आशयाचे निवेदन दिले आहे.
(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने नायब तहसिलदार वसई यांच्यामार्फत चौकशी केली असता, तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. तथापि, रेतीची अवैध वाहतुक करणाऱ्या ट्रकमालक व ट्रकचालक यांच्याविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खरिवली (ता.वाडा, जि.पालघर) येथील व्यवसायिकाने बेकायदा उत्खनन केल्याबाबत.**

**(२४) ७३९०९ (१२-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खरिवली (ता.वाडा, जि.पालघर) या गावातील एक व्यवसायिक गावातीलच एका आदिवासी मालकाची जागा घेऊन सदर जागेवर क्रशर लावून माती, खडी व दगडाचे बेकायदा उत्खनन करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उत्खननादरम्यान होणाऱ्या स्फोटामुळे गावातील देवस्थान, रस्ते आणि घरांना तडे जाऊन दुर्घटना घडण्याचा धोका निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बेकायदा उत्खननामुळे शासनाच्या लाखो रूपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी सदरहू जमीन मूळ मालकाला परत करणेबाबत तसेच चौकशी करून दोषी व्यवसायिकावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१) मौजे खरिवली तर्फे पोलबार (ता.वाडा, जि.पालघर) येथील ग. नं. २२४/१ क्षेत्र ०.५७ हे. आर ही जमीन एका आदिवासी व्यक्तीच्या मालकीची असून, तहसीलदार वाडा यांच्याकडून त्यांना दि.३०.११.२०१७ पर्यंत दगड उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आली आहे.
(२) दगड खदानीमध्ये ब्लास्टींग करून उत्खनन करीत नसून, ब्रेकरच्या (पोकलेन) सहाय्याने दगडाचे उत्खनन करण्यात येत आहे. त्यामुळे देवस्थान, रस्ते व घरांना तडे जाऊन दुर्घटना घडण्याचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) सदर आदिवासी व्यक्तीने परवानगीपेक्षा ९ ब्रास जास्त दगडाचे उत्खनन केल्याबद्दल तहसिलदार वाडा यांनी दंडात्मक कारवाई करून त्यांच्याकडून रू. ४७,७४५/- एवढी रक्कम वसूल करून शासनजमा केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीकडून दंड वसूल करण्याबाबत**

**(२५) ७५६०७ (१२-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा-भिवंडी-मनोर या रस्त्याच्या कामासाठी वापरलेल्या गौण खनिजापोटी सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीला २४७ कोटी, ११ लाख, ३७ हजार, ५२० रुपयाचा दंड आकारण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा दंड कंपनीने केलेल्या ८.५४ लाख ब्रास गौणखनिज उत्खननाचे स्वामित्वधन शासनजमा न केल्यामुळे आकारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीवर आकारण्यात आलेला दंड वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१), (२) व (३) सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लि. या कंपनीने ठाणे व पालघर जिल्हयांच्या हद्दीतील मनोर-वाडा-भिवंडी या रस्त्याच्या कामासाठी ७,३०,२०८ ब्रास गौण खनिजाचा वापर स्वामित्वधन शासनजमा न करता केल्याचे निदर्शनास आल्याने तहसिलदार वाडा, पालघर व भिवंडी आणि उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी संबधित कंपनीविरूध्द वेळोवेळी आदेश पारित करून, एकूण रू.४,७९,६९,४१,०२५ एवढा दंड आकारला आहे.

संबंधित कंपनीने तहसीलदार पालघर व वाडा यांच्या उक्त आदेशाविरूध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून, त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्ता यांच्याविरूध्द सक्तीची कारवाई करू नये असे अंतरिम आदेश दिले आहेत. सदर रिट याचिकांमधील मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार दंडाची रक्कम वसूलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

तहसिलदार भिवंडी यांच्याकडून दंडाच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन अधिनियमात सुधारणा करण्याबाबत**

**(२६) ७६२८६ (१३-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व राज्याच्या दृष्टीने महत्वाच्या प्रकल्पांसाठी भूसंपादन करतांना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन महाराष्ट्र राज्य शेती महामंडळावरील जमिनीवर करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन अधिनियमात सुधारणा करण्याबाबत राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता दिल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत या शेतीमहामंडळाकडे ६८ हजार ८२६ एकर शेतजमीन असुन त्यापैकी २६ हजार ५०९ एकर क्षेत्र हे माजी खंडकऱ्यांना वाटपासाठी प्रस्तावित असुन उर्वरित ४२ हजार ३१६ एकर क्षेत्र महामंडळाकडे शिल्लक राहत असुन ते अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व पुणे जिल्ह्यामध्ये आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ मधील निर्णय भूसंपादनाला खाजगी जमीनधारकांचा होणाऱ्या विरोधामुळे अनेक प्रकल्पांना होणारा विलंब लक्षात घेऊन घेण्यात आला आहे तरी या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१७) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळातील जमीनी राज्य शासन अधिसुचित करेल अशा सार्वजनिक प्रकल्पातील प्रकल्पबाधींतांच्या पुनर्वसनासाठी वाटप करणे शक्य व्हावे याकरीता महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा निर्णय दिनांक २७/१२/२०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार सदरची सुधारणा उक्त कायद्यामध्ये करण्यासाठीच्या विधेयकास सन २०१७ च्या पहिल्या अधिवेशनामध्ये विधानमंडळाची मान्यता प्राप्त झाली असुन सदर विधेयक मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विविध व्यक्ती आणि संस्थाना कब्जेहक्काने किंवा भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनीबाबत**

**(२७) ७६४३४ (१२-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध व्यक्ती आणि संस्थाना कब्जेहक्काने किंवा भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतींच्या बांधकामासाठी मुदतवाढ देतांना मोठ्या प्रमाणात अधिमुल्य (प्रीमीयम) आकारण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धोरणानुसार जमीन महसूल संहितेत सुधारणा करणे गरजेचे असताना सुधारणा न करण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१७) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतूदीनुसार शासकीय जमीन विविध व्यक्ती, संस्था अथवा कंपनी यांना विविध प्रयोजनार्थ कब्जेहक्काने अथवा भाडेपटटयाने वेळोवेळी प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील इमारत बांधकामासाठी अधिमूल्य आकारुन मुदतवाढ देण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. जमीन-२०१६/प्र. क्र.२५४/ज-१, दिनांक ११.१.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

सदर प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये सुधारणा अपेक्षित नाही.

___________

**ठाणे जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकारी नेमलेल्या ठिकाणी हजर राहत नसल्याबाबत**

**(२८) ७६६०८ (१२-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी नेमलेल्या ठिकाणी दररोज हजर राहत नसल्यामुळे जनतेची विविध कामांसाठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियुक्तीच्या ठिकाणी उपलब्ध रहाणे बंधनकारक असल्याचे परिपत्रक जाहीर करूनसुद्धा बहुतांश तलाठी व मंडळ अधिकारी नेमणुकीच्या ठिकाणी हजर नसतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही ठिकाणी तलठ्यांकडून सर्वसामान्यांना ७/१२ वा अन्य प्रकारचे दाखले देताना हेतुपूरस्सर विलंब करणे, जास्त पैशाची मागणी करणे इत्यादी प्रकारे त्रास दिला जात असून व बिल्डर वा त्यांच्या प्रतिनिधींना त्वरीत दाखले दिले जात आहे तसेच नोंदी घेतल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकारास आळा बसण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१७) :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यात शहापूर, मुरबाड, उल्हासनगर, भिंवडी, कल्याण, अंबरनाथ आणि ठाणे असे एकूण ७ तालुके असून शहापूर तालुका अतिदुर्गम, विस्ताराने मोठा व ठाणे तालुका हा लोकसंख्येने सर्वात मोठा तालुका आहे. सध्या गाननं. ७/१२ संगणकीकरणाचे कामकाज सुरु असून मंडळ अधिकारी व तलाठी यांना त्या-त्या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या वर्कस्टेशन येथे एकत्रितरित्या कामकाज करणेसाठी बसविणेत आले आहे. ठाणे जिल्हयातील सर्व तालुक्यातील गाननं.७/१२ व फेरफारांचे संगणकीकरण करण्यात आले असुन त्याचे ऑनलाईन पध्दतीने तलाठी यांच्या स्वाक्षरीने नागरिकांना/शेतकऱ्यांना वितरण केले जाते. तथापि, गाननं.७/१२ देतांना तांत्रिक अडचणी जरी आल्या तरी त्यांचे निराकरण करुन शेतकऱ्यांना/नागरिकांना गाननं.७/१२ तसेच दाखले देखिल वितरित केले जातात. याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या निदर्शनास आल्या नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीगोंदे (जि.अहमदनगर) तालुक्यातील लोणी व्यंकनाथ सेवा संस्थेने खरेदी केलेल्या जमिनीबाबत

**(२९) ७७४७५ (१२-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदे (जि.अहमदनगर) तालुक्यातील लोणी व्यंकनाथ सेवा संस्थेने खरेदी केलेल्या जमिनीचा गट एक असून उतारे अनेक निघत असल्याने तहसिलदार (श्रीगोंदे) यांनी दोन उताऱ्यावर वेगवेगळे क्षेत्र नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हे दाखल करणार असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सांगितले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकारी व इतर संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१७) :** (१) मौजे लोणी व्यंकनाथ ता.श्रीगोंदा येथील न.भु.क्र.२८५ मधील लोणी व्यंकनाथ विविध कार्यकारी सोसायटी लि.यांनी खरेदी केलेल्या क्षेत्रास नाव दाखल करणेकामी दिनांक ७/१२/२०१६ रोजी उप अधिक्षक,भुमि अभिलेख, श्रीगोंदा यांचेकडे अर्ज दाखल केल्यानुसार फेरफार नोंद क्र.७२/२०१६ दिनांक ९/१२/२०१६ रोजी मंजुर करण्यात येवुन संस्थेच्या नावाने ११४७.७५ चौ.मि.एवढे क्षेत्र दाखल केले व त्यानुसार मिळकत पत्रिकेची नक्कल देण्यात आली. त्यानंतर निमतानदार क्र.२ यांनी स्वअधिकारात मिळकतपत्रिकेवरील खरेदीच्या क्षेत्रामध्ये खाडाखोड करुन ११४७.७५ चौ.मी. ऐवजी १०६५.१६ चौ.मी.अशी दुरुस्ती करुन स्वअधिकारात नक्कल दिली.

(२) व (३) सदर सदोष कार्यवाहीबाबत वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने उप अधिक्षक, भुमि अभिलेख, श्रीगोंदा यांनी सादर केलेल्या अहवालास अनुसरुन जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख, अहमदनगर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५८ अन्वये न.भु.क्र.२८५ चे मिळकत पत्रिकेवरील खरेदी नोंदीतील फेरफार क्र.७२/२०१६ मधील सदोष कार्यवाही रदद करण्यास परवानगी देण्यात आली. त्यानुसार संस्थेस दुरुस्त केलेल्या क्षेत्रानुसार मिळकतीची नक्कल देण्यात आली आहे.

न.भु.क्र.२८५ चे फेरफार क्र.७२/२०१६ मध्ये स्वअधिकारात मिळकत पत्रिकेवरील खरेदीच्या क्षेत्रामध्ये खाडाखोड केल्याची सदोष कार्यवाही केल्याने उप अधिक्षक, भुमि अभिलेख, श्रीगोंदा यांच्या दिनांक १८/३/२०१७ रोजीच्या आदेशान्वये दोषी कर्मचारी निमतानदार क्र.२ यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम १० अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने मुंबईत दीर्घकालीन भाडेपट्टयावर विविध उद्योगांना दिलेल्या जमिनीबाबत**

**(३०) ७८२८३ (१२-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुंबईत दीर्घकालीन भाडेपट्टयावर विविध उद्योगांना जमिनी दिलेल्या असून मुंबई शहर जिल्ह्यातील १२८२ तर मुंबई उपनगर जिल्ह्यातील २९५ मिळकती भाडेपट्टयावर देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भाडेपट्टयावर देण्यात आलेल्या मिळकतीपैकी मुंबईतील ६९२ तर मुंबई उपनगरातील १४९ मिळकतींचा भाडेपट्टा कालावधी संपुष्टात आला असून त्यांचे नुतनीकरणही करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने आढावा घेऊन सदर जमिनीच्या भाडेकराराचे नुतनीकरण करण्याबाबत अथवा जमिनी शासनजमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०८-२०१७) :** (१) मुंबई शहर जिल्ह्यामध्ये १३०७ व मुंबई उपनगर जिल्ह्यात ३५६ शासकीय मिळकती विविध प्रयोजनाकरीता भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आल्या आहेत.

(२) मुंबई शहर जिल्ह्यात ६७५ व मुंबई उपनगर जिल्ह्यात १४९ शासकीय मिळकतींचा भाडेपट्टा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

(३) व (४) शासन निर्णय क्र.जमीन-२५०५/प्र.क्र.४०५/ज-२, दि.१२.१२.२०१२ च्या तरतुदीनुसार भाडेपट्टा संपुष्टात आलेल्या भाडेपट्टाधारकांना नुतनीकरणा करिता नोटिस बजावण्यात आल्या आहेत. यानुसार जमिनींच्या भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रीयल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर या संस्थेला दिलेल्या भूखंडाबाबत**

**(३१) ७८२८४ (१२-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई या इमारतीचा भूखंड (क्र.६३९) एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रीयल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सेंटर या संस्थेला दिनांक १८ नोव्हेंबर, १९७४ रोजी करारान्वये भाडेपट्टयाने दिला असून त्यानंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून अनेक अटी घातल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेला किती क्षेत्रफळाचा भूखंड भाडेकराराने देण्यात आला होता व त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती घालण्यात आल्या होत्या,

(३) असल्यास, सदर संस्थेविरुध्द इमारतीतील भाडेकरुंच्या असोसिएशनने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये अथवा त्यापूर्वी शासनाकडे तक्रारी केल्या असून तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई यांनी याबाबत सुनावणी घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भाडेकरुंच्या असोसिएशनने शासनाकडे केलेल्या तक्रारींचे स्वरूप काय आहे व त्याबाबत घेण्यात आलेल्या सुनावणीचे निष्कर्ष काय आहे,

(५) असल्यास, उक्त सुनावणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०९-२०१७) :** (१) व (२) शासनाने दि.१६/१०/१९७० च्या आदेशान्वये ६ हे. ९६.४९ आर क्षेत्रफळाची पुन:प्रापित शासकीय जमीन एम.विश्वेश्वरय्या औद्योगिक संशोधन व विकसन केंद्राला भाडेपट्टयाने दिली होती. तद्नंतर दि. १८/११/१९७४ च्या शासननिर्णयान्वये पूर्वी निर्गमीत केलेले सर्व आदेश अधिक्रमित करून एकुण ७१०७१ चौ.मी. क्षेत्रफळाची शासकीय जमीन उक्त संस्थेस भाडेपट्टयाने देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यापैकी शासनाच्या दि.१६.४.१९७९ च्या आदेशान्वये २३०४६ चौ.मी. जमीन शासनाने परत घेतली. सद्यस्थितीत एम.विश्वेश्वरय्या औद्योगिक संशोधन व विकसन केंद्र यांचेकडे ४८०२५ चौ.मी. इतकी शासकीय जमीन आहे. सदर शासकीय जमीन भाडेपट्टयाने देताना ती प्रामुख्याने खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून दिली आहे :-

(i) सदर शासकीय जमीनीचा भाडेपट्टा हा ९९ वर्षासाठी असेल. तदनंतर त्याचे नुतनीकरण करता येईल.

(ii) सेंटरने एकूण मिळणा-या उत्पनामधून संस्थेच्या व्यवस्थापनावर व इतर कामावर तसेच विविध कर अदा करण्यासाठी होणारा खर्च वजा जाता जे निव्वळ उत्पन्न मिळेल त्या उत्पन्नाच्या ५०% रक्कम शासनास अदा करावी लागेल.

(iii) रुपये ३२५/- प्रति चौ. मी. या दराने एकूण जमीनीच्या किमंतीच्या ६.५०% या दराने भुईभाडे दरवर्षी आकारण्यात येईल.

(iv) शासनाच्या परवानगीशिवाय सदरहू जमीन किंवा तिचा कोणताही भाग गहाण ठेवता येणार नाही किंवा हस्तांतरित करता येणार नाही.

(v) जमीन मंजूर करण्याच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास भाडेपट्टा रद्द करुन कोणत्याही भरपाईशिवाय जमीन परत घेण्याचा शासनास अधिकार राहिल.

(३) होय.

(४) जागा प्रदान आदेशातील अटी व शर्तीचे उल्लंघन व जागेच्या वापराबाबत अनियमितता झालेची तक्रार भाडेकरुंच्या असोशिएशन यांनी केली होती. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या स्तरावरील याबाबतच्या सुनावणीमध्ये भाडेपट्टामधील अटी व शर्तीचे भंग झालेचे आढळून आले.

(५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.२४/११/२०१६ च्या आदेशान्वये सदर जागा शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत आदेश दिले होते. या विरुध्द एम.विश्वेश्वरय्या औद्योगिक संशोधन व विकसन केंद्र यांनी मा. उच्च न्यायालयात दावा क्र.३१४१/२०१६ दाखल केला. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली व मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी यांचे दि. २४/११/२०१६ चे आदेश महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणात आव्हानित करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**मौजे पिंपळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील मिळकत क्र. १, २, ३, आणि १०९ मिळकतीस ग्रामपंचायत पिंपळगावचे नाव लावणेबाबत**

**(३२) ७८६४१ (१२-०४-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील मिळकत क्र १, २, ३ आणि १०९ या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यावर पूर्वीच्या ग्रामपंचायत पंचाळेचे नाव लागले असून सदरच्या मिळकतीस ग्रामपंचायत पिंपळगावचे नाव लावणे बाबत स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे जिल्हाधिकारी नाशिक यांना लेखी निवेदने देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१७) :** (१) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा.विधानसभा सदस्य, सिन्नर यांनी तहसिल कार्यालय, सिन्नर येथे ग्रामपंचायत पिंपळगांवच्या ठरावासह दिनांक ३०/९/२०१६ रोजी निवेदन दाखल केलेले आहे.

(२) व (३) मा.विधानसभा सदस्य, सिन्नर यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, सिन्नर यांनी दिनांक १६/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदरचे प्रकरण जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयास सादर केलेले असुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर यांना त्यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्यामार्फत सादर करण्याबाबत सुचित केलेले आहे.

तद्नंतर जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक २९/१२/२०१६ रोजीच्या पत्रानुसार प्रकरणी मुददेनिहाय स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह प्रस्ताव सादर करणेबाबत तहसिलदार, सिन्नर यांना कळविले आहे. त्यानुसार तहसिलदार, सिन्नर यांनी गट विकास अधिकारी, सिन्नर यांना

मुददेनिहाय चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. सदर मुददेनिहाय अहवाल अद्याप अप्राप्त आहे. त्रुटीपुर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकरणी कार्यवाही करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, नाशिक यांनी घेतलेली आहे.

---

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील मुख्य रस्ते, दाभाडी ते किन्हवली रस्त्यांची व नदीवरील पूलांची झालेली दुरवस्था**

**(३३) ७८७९१ (१४-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील मुख्य रस्ते, दाभाडी ते किन्हवली या रस्त्याची व नदीवरील पूलाची दुरवस्था झाली असून या गावात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे दिनांक २२ जानेवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार रस्ते व नदीवरील पूलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) डहाणू तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत १९७.४६७ कि.मी व जिल्हा परिषद,पालघर यांच्या अखत्यारीत ११७९.८४कि.मी लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांच्या लांबी पैकी काही लांबीत रस्ते क्षतिग्रस्त झाले आहेत. या रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्त्यांवरुन वाहतुक सुरळीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

दाभाडी किन्हवली रस्ता सा.बां.वि च्या ताब्यात आहे. या रस्त्याची सुधारणा करणे व पुलांची पुर्नबांधणी करण्याचे काम हाती घेवून जवळ जवळ पुर्ण करण्यात आले आहे. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत चालु आहे.

तालुक्यातील रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीतील सुधारणा व दुरुस्तीची कामे मंजुरी, निकष, निधी व प्राधान्य क्रमानुसार हाती घेवुन पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये तलाठी सज्जा वाढविण्याबाबत**

**(३४) ७९५२३ (१२-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये तलाठी सज्जा कमी असल्यामुळे तलाठी कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने व लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी तलाठी सज्जा वाढविण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०७-२०१७) :** (१), (२) व (३) वाढीव तलाठी साझे मंजूर करण्याची मागणी शासनाकडे विविध माध्यमातून करण्यात आली होती. यासंदर्भात विचारांती शासन निर्णय दिनांक २५ मे, २०१७ अन्वये संपूर्ण राज्यात ३१६५ नवीन वाढीव तलाठी साझे व ६ तलाठी सांझासाठी १ महसूली मंडळ या तत्वाप्रमाणे ५२८ नवीन महसूली मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे महसूली विभागासाठी मंजूर ४६३ नवीन तलाठी साझे व ७७ नवीन महसूली मंडळांमध्ये सोलापूर जिल्हयासाठी एकूण १२ नवीन वाढीव तलाठी साझे व २ नवीन वाढीव महसूल मंडळाचा समावेश आहे. शासनाने दिलेल्या वेळापत्रकानुसार जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सोलापूर जिल्हयात आवश्यक तेथे नवीन वाढीव तलाठी साझे व महसूली मंडळे स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगाव (जि.जळगाव) तालुक्यातील दलवाडे शिवारातील गिरणा नदीपात्रातील वाळू लिलावाबाबत**

**(३५) ७९७५० (१२-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगाव (जि.जळगाव) तालुक्यातील दलवाडे शिवारातील गिरणा नदीपात्रातील वाळू लिलावास विरोध करणारे निवेदन ग्रामस्थांनी भडगाव निवासी नायब तहसीलदार यांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०९-२०१७) :** (१) व (२) भडगाव तालुक्यातील मौजे गोंडगाव व दलवाडे येथील ग्रामस्थांकडून मौजे दलवाडे येथील वाळूगटाचा लिलाव रद्द करण्याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, शासन निर्णय दि.१२/०३/२०१३ अन्वये, विहित केलेल्या वाळू/रेती निर्गती धोरणातील तरतुदीनुसार जिल्हास्तरीय समितीने सुनावणी घेऊन, सदर वाळूगटाचा लिलाव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील वाळू साठ्यांच्या लिलावाबाबत**

**(३६) ८०१७८ (१२-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात ऑनलाईन वाळू लिलावात ६९ वाळू साठ्यांचे लीलाव अपेक्षित असताना पहील्या टप्प्यातील लिलावात केवळ ६ वाळू साठ्यांचे लिलाव होऊन ३ कोटी, ६३ लक्ष रुपयांचा महसूल शासनाला मिळाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील केवळ १९ वाळू साठ्याचाच लिलाव झाला असून वाळू लिलावाची किचकट ऑनलाईन प्रक्रिया व जास्त किंमत यामुळे उर्वरित साठ्यांचा लिलाव झाला नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित साठ्यांचे लिलाव न झाल्यामुळे बेकायदेशीर वाळू उपसा करण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून वाळू माफिया व शासकीय कर्मचारी यांच्या संगनमताने अवैध वाळूचा उपसा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर वाळू साठ्यांचा योग्य प्रक्रियेद्वारे लिलाव करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियावर व त्यास मदत करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०९-२०१७) :** (१), (२), (३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक १२.०३.२०१३ अन्वये विहित करण्यात आलेल्या वाळू/रेती निर्गती धोरणातील तरतुदीनुसार अहमदनगर जिल्ह्यात ग्रामसभेचा ठराव, पर्यावरण अनुमती प्राप्त करून हातची किंमत निश्चित करून ई-टेंडरिंग व ई-ऑक्शन प्रकियेद्वारे वाळूगटांचे लिलाव करण्यात येतात. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यात सन २०१६-१७ साठी लिलावासाठी योग्य असे ६९ वाळूगट निश्चित करण्यात आले आहेत. त्यापैकी आतापर्यंत १८ वाळूगटांचे लिलाव होऊन त्यापासून रुपये ८,६६,२६,६८३/- एवढा महसूल शासनास प्राप्त झालेला आहे. वाळू/रेती निर्गती धोरणातील तरतूदींनूसार उर्वरीत वाळूसाठ्यांच्या लिलावाची प्रक्रिया सुरू आहे.

अहमदनगर जिल्ह्यात गौण खनिजाची अवैध उत्खनन वाहतुक रोखणेकामी जिल्हास्तरावर उपविभाग स्तरावर व तालुका स्तरावर भरारी पथके गठित करण्यात आलेली आहेत. सदर भरारी पथकांनी सन २०१६-१७ या कालावधीत केलेल्या तपासणीत गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीच्या ८८५ वाहनांवर कारवाई करून, रू. ३,२२,०१,०००/- एवढा दंड वसुल करण्यात आलेला आहे. तसेच एकूण ८० वाहनधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, २७० वाहन धारकांवर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चेकवेळवा (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) रेती घाटावरुन जाणारे अवैध रेतीचे तीन ट्रक पकडल्याबाबत**

**(३७) ८०८६० (१२-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेकवेळवा (ता.पोंभुर्णा, जि.चंद्रपूर) रेती घाटावरुन जाणारे अवैध रेतीचे तीन ट्रक दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजीच्या सुमारास तहसिलदार, पोंभुर्णा यांनी पकडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१) व (२) तहसिलदार पोंभुर्णा यांनी दि.१८/१/२०१७ रोजी पोंभुर्णा येथे चेकवेळवा येथून रेतीची अवैध वाहतूक करणारी ३ वाहने जप्त करून दंडात्मक कारवाईद्वारे रू.१,०२,७००/- एवढा दंड वसूल करण्यात आला. तसेच प्रत्येक वाहन मालकाकडून रू.२,००,०००/- चे बंधपत्र घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रुकडी (ता.हातकंणगले, जि कोल्हापूर) येथील नविन बांधकाम मिळकतीचा गावठाणात समावेश करण्याबाबत**

**(३८) ८१२९३ (१२-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रुकडी (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथील नविन बांधकाम मिळकतीचा गावठाणात समावेश करण्याबाबत तसेच सिटी सर्वे कार्यालयाकडून प्रॉपर्टी कार्ड मिळण्याबाबतच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी अतिग्रे फाटा येथे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ग्रामस्थांनी जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे वारंवार निवेदन देऊनही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर येथील सिटी सर्वे कार्यालयात मिळकत पत्रिकांवरील नोंदीनिहाय शुल्क आकारण्याबाबत अद्यापपर्यंत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०९-२०१७) :** (१), (२) व (३) रुकडी (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथील नविन बांधकाम मिळकतीचा गावठाणात समावेश करण्याबाबत तसेच सिटी सर्वे कार्यालयाकडून प्रॉपर्टी कार्ड मिळण्याबाबतच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी अतिग्रे फाटा येथे

दिनांक ०४ जानेवारी, २०१७ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते. या विषयीची ग्रामस्थांची दिनांक ११.०५.२०१६ व दिनांक ५.१२.२०१६ रोजीची जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना प्राप्त निवेदने अनुक्रमे दिनांक ११.०५.२०१६ व दिनांक ०६.१२.२०१६ रोजी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, कोल्हापूर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली होती. सदरचा मुद्दा धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण दि.२५.०९.२००१ नुसार नक्कल फी ची आकारणी करुन उतारा देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) ग्रामपंचायत, रुकडी यांचेकडून आवश्यक कागदपत्रे व ठराव प्राप्त न झाल्याने भूमी अभिलेख कार्यालयास पुढील कार्यवाही करता आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (ता.मेहकर, जि.बुलढाणा) शहरातील पेनटाकळी वसाहतीतील कार्यालयात गौण खनिजाचे उत्खन करून चोरी करण्यात आल्याबाबत**

**(३९) ८१४२९ (१२-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (ता.मेहकर, जि.बुलढाणा) शहरातील पेनटाकळी वसाहतीतील कार्यालयात गौण खनिजाचे उत्खनन करुन चोरी करण्यात आल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१), (२) व (३) मौजे मेहकर भाग-१, ता. मेहकर, जि. बुलढाणा येथिल पेनटाकळी प्रकल्पाच्या ताब्यात असलेल्या सर्वे नं.१०३ या जमिनीतून १०३ ब्रास मुरूमाचे अवैध उत्खनन करण्यात आल्याचे दि.१७.०१.२०१७ रोजी निदर्शनास आले आहे. त्यानुसार तहसिलदार मेहकर यांनी दि.२७.०२.२०१७ रोजी सदर अवैध उत्खननाची जबाबदारी उपविभागीय अधिकारी, पेनटाकळी प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग, मेहकर यांच्यावर निश्चित करून, त्यांच्या नावे रू. २,४७,२००/- एवढ्या रकमेच्या दंडाचे आदेश पारित करून, दंडाची रक्कम १५ दिवसाच्या आत शासनजमा करण्याचे आदेशित केले होते.

तथापि, सदर दंडात्मक रकमेचा भरणा संबंधितांनी अद्यापपर्यंत केला नसल्याने, तहसिलदार मेहकर यांनी दि.३/५/२०१७ रोजी सदर दंडात्मक रकमेची वसूली संबंधितांच्या वेतनातून करून शासनजमा करण्याबाबत कार्यकारी अभियंता, बुलडाणा पाटबंधारे विभाग, बुलडाणा यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घिवली (ता.जि.पालघर) गावाच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत**

**(४०) ८१९४५ (१२-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घिवली (ता.जि.पालघर) गावाच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या ४५० मीटर लांबीचे बांधकाम सन २००९-२०११ या कालावधीत पूर्ण झाले असून उर्वरित ७०० मीटर लांबीच्या दीड कोटी रुपयांच्या बांधकामास सन २०१५-२०१६ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासकीय मान्यता मिळूनही तिवरींची झुडपांमुळे काम सुरु झालेले नसल्यामुळे मा.मुख्यमंत्री, मा.पर्यावरण मंत्री व प्रधान सचिव, पर्यावरण यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये तिवरींची झुडपे स्वच्छ करण्याबाबत निवेदने दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उर्वरित बंधाऱ्याचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०९-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे. घिवली (ता.जि.पालघर) गावाजवळ १३० मी. लांबीचा बंधारा बांधण्याचे काम सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.१.५०कोटी अंदाजित किंमतीचे समाविष्ठ असून त्यासाठी रु.३२.६१लक्ष व सन २०१७-१८ मध्ये रु.२५.८२लक्ष एवढया निधीची तरतूद आहे.

(२) होय.

(३) धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र (CRZ Clearance) घेण्यासाठी कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**ठाणे जिल्ह्यात बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन तसेच वाहतूक करणाऱ्या रेतीमाफियांवर एमपीडीए कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याबाबत**

**(४१) ८२००२ (१२-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन तसेच वाहतूक करणाऱ्या रेतीमाफियांवर एमपीडीए कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याचा निर्णय रेती गटशाखेने माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने एमपीडीए कायद्यानुसार किती जणांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१) व (२) उपविभागीय अधिकारी कल्याण यांनी दि.१७.०२.२०१७ च्या पत्रान्वये पोलीस उपायुक्त परिमंडळ कल्याण-३ यांना अनधिकृत गौण खनिज गुन्हे प्रकरणात वारंवार आढळणाऱ्या इसमांवर एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले असून, रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतुक प्रकरणी एम.पी.डी.ए. कायद्यानुसार अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयातील रिक्त पदांबाबत

**(४२) ८४४१४ (१२-०४-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयातील उपनिबंधक, भूमापन अधिकारी, दप्तरबंद व शिपाई ही पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांची भूमापनाची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१७) :** (१) उप अधीक्षक भूमि अभिलेख, अकोले हे पद रिक्त आहे. परंतु नागरिकांच्या कामाची अडचण होवू नये म्हणून या पदाचा अतिरिक्त पदभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. तसेच वर्ग ४ संवर्गातील दफ्तरबंद व शिपाई अशी दोन पदे रिक्त आहेत. तथापि,जमीन मोजणी, फेरफार नोंदी तसेच अभिलेखाच्या नकला जनतेस देणेकामी आवश्यक असलेली मुख्यालय सहाय्यक, शिरस्तेदार, भूमापक, निमतानदार, परिरक्षण भूमापक, प्रतिलिपी लिपिक ही वर्ग - ३ संवर्गातील सर्व पदे भरलेली आहेत.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, अकोले या कार्यालयात एप्रिल २०१७ अखेर ११३ मोजणी प्रकरणे शिल्लक असून त्यापैकी ७३ प्रकरणात मोजणीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. तसेच ३७ प्रकरणात मोजणी तारखा ई मोजणी आज्ञावलीद्वारा निश्चित केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे ३ कोर्टकमिशन / वाटप प्रकरणात मा.न्यायालयाची स्थगिती असल्याने ती प्रलंबित आहेत.
(२) उप अधीक्षक भूमि अभिलेख, अकोले हे रिक्त पद नियत कालिक बदलीवेळी / पदोन्नतीने भरण्याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनेरी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील ट्रेकिंग सेंटरचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(४३) ८६५७५ (१२-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनेरी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील ट्रेकिंग सेंटरचे काम गत तीन वर्षापासून अपूर्ण असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या ट्रेकिंग सेंटरचे काम तातडीने पूर्ण करून ट्रेकिंग सेंटर कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
अंजनेरी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील ट्रेकिंग सेंटर बांधकामाचे काम पूर्ण करण्यात आले असून विद्युतीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(२) व (३) ट्रेकिंग सेंटरचे काम विहित कालमर्यादेत पूर्ण केले नसल्याने ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. प्रस्तुत इमारत विद्युतीकरणासह पूर्ण करून माहे डिसेंबर, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**गडनदी व जानवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) नदीवरील पाच पूल धोकादायक झाल्याबाबत**

**(४४) ८७१४१ (१२-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील खारेपाटण पासून सुरु होणाऱ्या धोकादायक ब्रिटीशकालीन पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे काम ध्रुव कन्सल्टन्सी, मुंबई या संस्थेला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेने गडनदी व जानवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) नदीवरील पाच पूल धोकादायक असल्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पूलांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील सर्व पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे काम मे.ध्रुव कन्सलटन्सी यांच्यामार्फत प्रगतीत आहे.प्रश्न क्र. २ मधील पुलांची संख्या ५ नसुन दोन आहे. सदरचे दोन्ही मोठे पुल सुस्थितीत आहे.

(३) सदरच्या दोन मोठया पुलांपैकी जानवली पूलाचे जागी ७३.४० मीटर लांबीचा नवीन चौपदरी पूल बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे व गडनदीवरील मोठया पूलाचे काम राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या मंजूर चौपदरीकरणांच्या कामात समाविष्ठ असून सदर कामाचा करारनामा झालेला आहे व काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजेंद्रनगर (जि.कोल्हापूर) येथे एकाच प्लॉटची अनेकांना झालेली विक्री**

**(४५) ८७६३८ (१९-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजेंद्रनगर (जि.कोल्हापूर) येथील एकाच प्लॉटची अनेकाच्या नावे विक्री झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार एकाच प्लॉटची अनेकांच्या नावे विक्री करणाऱ्यांवर तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०९-२०१७) :** (१) व (२) मौजे राजेंद्रनगर (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील भूमापन क्र. ५३०, हिस्सा क्र.१/१३ पै प्लॉट नं. १ क्षेत्र २९७.४० चौ.मी. ची विक्री मूळ प्लॉटधारक सौ. छाया ओमप्रकाश चव्हाण यांच्या खोट्या सहया करुन व अज्ञात व्यक्ती उभी करुन बोगस रजिस्टर्ड खरेदी पत्रक केलेबाबत मूळ प्लॉटधारक यांनी दिनांक ०७.०४.२०१७ रोजी तहसिल कार्यालय, करवीर येथे तक्रारी अर्ज दाखल केला आहे. त्यावर उपविभागीय अधिकारी, करवीर यांचे न्यायालयात रजिस्टर्ड खरेदी दस्ताच्या आधारे नोंद झालेल्या फेरफार क्र. ८७९०२ व ८८५४६ बाबत केलेले अपिल सुनावणी स्तरावर आहे.

या मिळकतीचे मुळ प्लॉट धारक सौ. छाया चव्हाण रा. हैद्राबाद, तलेंगणा यांनी सदर प्लॉटच्या विक्रीबाबत केलेल्या तक्रारीनुसार जुना राजवाडा पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल झाला असून पोलीसखात्यामार्फत चौकशी चालू आहे.

सौ. छाया चव्हाण यांनी दिनांक २४.०४.२०१७ रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालय, करवीर क्र.३ यांचेकडे दस्त क्र. ४३४७/२०१६ बोगस झालेबाबत केलेल्या तक्रारीवरील सुनावणीदेखील त्यांचेकडे चालू आहे.
(३) फेरफार क्र. ८७९०२ व ८८५४६ बाबत दाखल केलेले अर्धन्यायीक कामकाज उपविभागीय अधिकारी, करवीर यांचेकडे सुरु असून अपील अद्याप निर्णित झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा सांगवी, पो.नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील शेत जमिनीवर प्रविण मसाले कंपनीने अतिक्रमण व खोदकाम केल्याबाबत**

**(४६) ९००९२ (१२-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा सांगवी, पो.नायगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या सर्व्हे क्र. ५२३ या शेत जमिनीवर प्रविण मसाले या कंपनीने अतिक्रमण व खोदकाम करून शेतीचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, सातारा व पोलीस महासंचालक यांचेकडे दिनांक २३ जानेवारी, २०१३ व २३ ऑक्टोबर, २०१५ रोजी लेखी तक्रारी केल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर कंपनीवर व इतर संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०९-२०१७) :** (१), (२), (३) व (४) श्री. चंद्रकांत विठ्ठल वीर या व्यक्तीने तहसिलदार, खंडाळा यांना या संदर्भात लिहिलेला दिनांक २३.१०.२०१५ रोजीचा अर्ज तहसिलदार कार्यालयात प्राप्त झाला होता. सदर अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी नसल्याने, अर्जासोबत अर्जदाराची जमीन स.नं. ५२३ चे गां. न. नं. ७/१२ उतारे न जोडल्यामुळे तसेच त्यांचे जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबतचा भू नकाशा न जोडल्यामुळे अर्जदारांना आवश्यकत्या कागदपत्रांची पुर्तता करुन फेरअर्ज सादर करण्याबाबत तहसिलदार, खंडाळा यांनी त्यांचे दिनांक ३०.११.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना ते खामगांव या राष्टीय महार्गावरील गतीरोधक काढल्याबाबत**

**(४७) ९१३९६ (१२-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील जालना ते खामगांव या राष्टीय महामार्गावर रस्ता दुरूस्तीचे काम सुरू असून देऊळगांव मही, चिखली, अमडापूर, उंद्री या ठिकाणचे गतीरोधक काढून टाकल्यामुळे वाहणे वेगात चालविली जात असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने शहरालगत गतीरोधक उभारण्याची मागणी नागरीकांकडून होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर मार्गावरील वर्दळीच्या ठिकाणी गतीरोधक उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१७) :** (१) जालना ते खामगाव रस्ता दुरुस्ती करताना गतिरोधक काढून टाकले हे खरे नाही.शहरालगत गतिरोधक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे.
(२) व (३) जालना चिखली रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करताना कोणतेही गतिरोधक काढून टाकलेले नाही. तथापि आवश्यक ठिकाणी थर्मोप्लास्टीक रंगाने गतीरोधक रंगविण्यात आलेली आहेत.

चिखली ते खामगांव हया राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ च्या पेव्हड शोल्डर दुपदरीकरण बांधकामाची निविदा निश्चित झालेली असून राष्ट्रीय महामार्गाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्रात रस्ते सुरक्षा उपाययोजनेची तरतूद निविदेमध्ये करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धारणी-खामला-अचलपूर-अमरावती-यवतमाळ-कारंजा या रस्त्याच्या सुधारणा कामाबाबत**

**(४८) ९१६९६ (१२-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) धारणी-खामला-अचलपूर-अमरावती-यवतमाळ-कारंजा या रस्त्याच्या सुधारणा कामामध्ये महत्वपूर्ण सुधारणा कामांचा समावेश करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश शासनाने प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१७) :** (१) हे खरे आहे.
अशा आशयाची मागणी मा.मुख्यमंत्री यांना दि.०९.०१.२०१७ च्या पत्रान्वये केलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदरचा प्रकल्प केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग यांच्यातर्फे मागास क्षेत्र/धार्मिक/पर्यटन क्षेत्र (BRT) जोडण्याच्या योजनेमध्ये राबविण्यात येत असून हया रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत असून सर्व लोकप्रतिनिधींच्या सूचना सविस्तर प्रकल्प अहवालात अंतर्भूत करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बिंदूसरा (जि.बीड) नदीवरील ब्रिटीश कालीन पूल वाहतूकीसाठी बंद असल्याबाबत

**(४९) ९२६८७ (१२-०८-२०१७). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिंदूसरा (जि.बीड) नदीवरील ब्रिटीश कालीन पूल गत वर्षभरापासून वाहतूकीसाठी बंद असल्याकारणाने सर्वसामान्य नागरिकाना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी नवीन पूल उभारण्याबाबत किंवा पुलाची दुरुस्ती करण्याबाबत संबंधीतांना वारंवार लेखी कळवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त नदीवर नवीन पूल उभारण्याबाबत किंवा जुन्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१७) :** (१) पुलाची धारणक्षमता विचारात घेवून पूल जड वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे.
(२) व (३) दि.११.०६.२०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बाहय वळण रस्त्याच्या क्षतिग्रस्त झालेल्या भागाची तात्काळ पुर्नस्थापना करण्यात आल्याचे तसेच जुना पुल तोडून नविन चौपदरी पुलाचे बांधकाम हाती घेण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंधेरी (पूर्व) येथे उड्डाणपुलाखाली सरकत्या जिन्यासह पादचारी पुल बांधण्याबाबत

**(५०) ९३७२७ (२९-०७-२०१७). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गावर साखळी क्र.५१९/०० अंधेरी (पूर्व) येथे उड्डाणपुलाखाली पादचारी पूल बांधण्याकरिता प्रशासकीय मान्यता व सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.३.५ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, सदर पादचारी पूलाच्या कामाकरीता निधी व प्रशासकीय मान्यता मिळून २ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनही सदर पादचारी पूलाचे काम अद्याप सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पादचारी पूल न बांधल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना व वाहनांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सरकत्या जिन्यासह सदर पादचारी पूलाचे बांधकाम तातडीने सुरु करण्याकरीता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१७) :** (१) होय. तथापि प्रस्तुत कामास शासनाने रू.३.५० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या कामासाठी सन २०१६-१७ साठी रू.५४.०६ लक्ष रकमेची तरतूद  करण्यात आली होती.
(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे. प्रश्नांकित कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर या रस्त्यावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित असलेल्या मेट्रो लाईन-७ च्या कामाची सविस्तर आखणी व संकल्पन निश्चित न झाल्याने पुलाच्या आराखडयास अंतिम रूप देणे शक्य झाले नाही. या ठिकाणी रस्ता ओलांडणाऱ्या नागरिकांना व वाहनांना वाहतूक पोलीसांच्या मदतीने वाहतूक नियमन करून वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली आहे.

सद्यस्थितीत पश्चिम द्रुतगती मार्ग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.